संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
(नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)

जनसंपर्क विभाग

## विद्यापीठात 'महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा, २०१६' विषयावर २० जुलै रोजी कार्यशाळेचे आयोजन

अमरावती.

प्रशासकीय कामकाजात सुसूत्रता व सुसंगती यावी, याकरीता विद्यापीठातील प्रशासकीय विभागातील अधिकारी, कर्मचारी तथा महाविद्यालयीन कर्मचारी यांना प्रशिक्षण देण्यासाठी शासनाने निश्चित केलेल्या धोरणानुसार दिनांक २० जुलै, २०१९ रोजी सर्व संबंधित प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी तथा महाविद्यालयीन कर्मचारी यांचेकरीता 'महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा, २०१६' विषयावर कार्यशाळेचे आयोजन विद्यापीठाच्या डॉ.के.जी. देशमुख सभागृहात करण्यात आले आहे.

सदर कार्यशाळेकरीता विद्यापीठ प्रशासकीय विभाग व महाविद्यालयातील एक प्रशासकीय अधिकारी व एक कर्मचारी यांचे नामनिर्देशन करुन त्यांची नांवे directorhrdc@sgbau.ac.in या संकेतस्थळावर दिनांक १८ जुलै, २०१९ रोजी सायं. ५.०० वाजेपर्यंत पाठवावयाची आहे. तसेच सदर कार्यशाळेला उपस्थित राहण्याकरीता प्रवासभत्ता देय राहणार नसून भोजनाची व्यवस्था प्रशिक्षणाच्या ठिकाणावर करण्यात आली आहे. तरी आयोजित कार्यशाळेला सर्व संबंधितांनी जास्तीतजास्त संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन युजीसी - मानव संसाधन विकास केंद्राचे संचालक डॉ. प्रसाद वाडेगांवकर यांनी केले आहे.

---

प्रति,

**जनसंपर्क विभाग**

मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी

दि. १५/०७/२०१९.

दै.............................. अमरावती.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी